नरखेड जि. नागपूर येथील ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः पीएचडी १६०२७/१८/२०२५/पासु-२ (ई.क्र.९६३३८५)

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : २९ जून, २०२६.

वाचा :

१) **सहसंचालक आरोग्य सेवा: रुग्णालये राज्यस्तर मुंबई यांचे पत्र क्रमांक , आआसे/कक्ष-३ /टे.६/नरखेड५०खाटाबांधकाम/१४१०९-१०/२४, दिनांक १४/१०/२०२४.**
२) **सार्वजनिक आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र.श्रेणीव-२०२३/प्र.क्र.०६/आ-३, दि.२७.०२.२०२४**

प्रस्तावना :

नरखेड जि. नागपूर येथील ३० खाटा क्षमतेच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यास दि. २७ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय, नरखेड जि. नागपूर येथील रुग्णालय इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

नरखेड जि. नागपूर येथील ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक सन २०२२-२३ च्या म्हणजेच अद्ययावत दरसूचीवर आधारित आहे. प्रस्तावित इमारत तळमजला + १ मजला अशी प्रस्तावित असून सदर इमारतीचे एकुण क्षेत्रफळ ५१५०.०० चौ.मी. इतके आहे. तसेच बांधकामाचा दर रु. २८०००/ प्रति चौ.मी. आहे. प्रस्तावित बांधकामाचे अंदाजपत्रक मंत्रालयीन सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केल्यानुसार एकुण रु. २७१३.५७ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास सोबत जोडण्यात आलेल्या Recapitulation sheet प्रमाणे खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२) अटी व शर्ती :-

१) इमारतीचे आराखडे हे सार्वजनिक बांधकाम विभाग/शासकीय इमारतीच्या अनुज्ञेय मानकास अनुसरुन असण्याची खातरजमा करावी. अशा नकाशांना व वास्तुमांडणी आराखडयास शासनाचे वास्तुशास्त्रज्ञ यांची मान्यता घेण्यात यावी.

२) इमारत बांधकाम करण्यापूर्वी विदयुतीकरणाच्या कामासाठी मुख्य अभियंता (विदयुत) व स्थापत्यांच्या कामासाठी मुख्य अभियंता (स्थापत्य) यांची तांत्रिक मंजुर घेण्यात यावी.

३) कामासाठी निविदा मागविण्यापूर्वी सदर कामास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.

४) बांधकामासाठी उपलब्ध होणाऱ्या नियतव्ययामधून सदर कामास निधी उपलब्ध करुन देण्याच्या अटीच्या अधिन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

५) सदर कामाची ई-निविदा करतांना कामाचे तुकडे न करता एकत्रित निविदा करण्यात यावी.

६) कामासाठीच्या जागेची उपलब्धता, योग्यता व जागा पुरेशी आहे किंवा नाही याबाबतची खात्री संबंधित आरोग्य संस्था प्रमुखांनी करावी.

७) क्षेत्रिय जागेच्या परिस्थितीनुसार व आरोग्य संस्थांच्या आवश्यकतेनुसार प्रस्तावित कामाच्या किंमतीमध्ये अनावश्यक वाढ करण्यात येवू नये.

८) सदरचे अंदाजपत्रक हे ढोबळ नमुना अंदाजपत्रक असल्याने, या कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिकदृष्ट्या मान्यता ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या त्यात्या- क्षेत्राच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून करण्यात येईल.

९) स्थानिक ग्रामीण नगर विकास संस्थेच्या संबंधित नियमानुसार बांधकाम परवानगी तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग यांची राहील.

१०) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/ तां.क.१ दि. १० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

११) रुग्णालयाचे नकाशे तपासून नकाशांमध्ये रुग्णालयासाठी आवश्यक ऑक्सिजन पाईपलाईन, एअर कंडीशनरसाठी जागा व त्यांच्या duct चे नियोजन, दिव्यांगांकरीता करावयाच्या सोयीसुविधा, त्या व्यक्तींसाठी रुग्णालयात करावयाचे पथ-वे इ. तसेच याबाबतची Functionality विचारात घेवून रुग्णालयाचे नकाशे सुधारीत करण्यात यावेत. तसेच रुग्णालय डिझायनिंग मधील तज्ञ व्यक्ती व रुग्णालयाशी संबंधित डॉक्टर व कर्मचारी यांचेशी चर्चा करुन त्यानुसार रुग्णालयाचे नकाशे सुधारित करण्यात यावेत.

१२) केंद्र शासनाकडून निर्गमित IPHS च्या २०२२ च्या मार्गदर्शक सुनचांनुसार अंदाजपत्रकामध्ये सुधारणा समाविष्ट करुन प्रशासकीय मान्यतेच्या किंमतीच्या मर्यादेत राहून इमारतीचे बांधकाम करण्यात यावे.

१३) प्रस्तावित करण्यात आलेल्या इमारतीचे जोते क्षेत्रफळ व शासकीय इमारती यांच्या अनुज्ञेय मानकाप्रमाणे असल्याची खातरजमा करण्यात यावी.

१४) क्षेत्रियस्तरावर सदर बांधकामाचा संबंधित उपसंचालक आरोग्य सेवा व जिल्हा शल्य चिकित्सक यांनी वेळोवेळी आढावा घ्यावा.

१५) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्र.बीडीजी२०१७/प्र.क्र.६०/इमा-२, दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करावी.

१६) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुनच सदर कामाच्या निविदा सुचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

३. उपरोक्त १ ते १६ येथे नमूद अटींची पूर्तता करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा शल्य चिकित्सक यांची राहील.

४. सदर बांधकामावरील खर्च मागणी क्रमांक- एच-८, मुख्यलेखाशिर्ष "४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च, ०१- नागरी आरोग्य सेवा (वैद्यकीय सहाय),११०- रुग्णालये व दवाखाने, (१)(अ)- पंचवार्षीक योजनातंर्गत योजना -इमारती, (००)(०१)-मोठी बांधकामे (४२१० ००१४), ५३-मोठी बांधकामे" याखाली भागविण्यात येईल.

५. नरखेड जि. नागपूर येथील ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकामासाठी लागणाऱ्या रकमेची अर्थसंकल्पात तरतूद करण्याचा प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई यांनी त्वरीत शासनास सादर करावा.

६. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम,भाग-२, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग-पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक १ येथील परिच्छेद क्र.१३४(१) अनुसार तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम,भाग-२, दि.२०.०९.२०१९ मधील भाग-१ उपविभाग-पाच, परिच्छेद क्र. १३४(१), १३४(२) आणि १३४(३) नुसार प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये व दि. ०७/०३/२०२५ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासन मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०६२९१८२५४५१८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAVITA PRADEEP PISE

Digitally signed by KAVITA PRADEEP PISE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PUBLIC HEALTH DEPARTMENT, 2.5.4.20=895D4DC43BA3105440C0329431446AE8333AB89578925B2D77D3806165DBD487, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AEEF37624AA6E5EA1AAA99D244C6C2A5F135097E5C07486A35D423835B4EC728, cn=KAVITA PRADEEP PISE
Date: 2026.06.29 18:54:28 +05'30'

(कविता प्र. पिसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.

२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३. संनियंत्रक तथा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर.
४. सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई.
५. उप संचालक, आरोग्य सेवा नागपूर मंडळ, नागपूर.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नागपूर.
७. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२, नागपूर.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, जि नागपूर.
९. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई.
१०. अवर सचिव (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवडनस्ती (पासू-२).

Name of the Department : Public Health Department

Name of Work : Construction of 50 Bedded Sub District Hospital Building at Narkhed, Dist - Nagpur.

Executing Agency : Public Works Department

Land Availability : Yes

Architect : Government

RECAPITULATION SHEET

Sr. No.	Particulars of Scope		Unit Rate Norms Rs Per (Sqmt./ Meter/ LumpSum etc.)		Cost Rs. Component Wise	Cost Rs. Total
(A)	**ESSENTIAL ITEMS (Components)**					
1	**Building proper (Built Up Area - Sq.m)**					
	Ground Floor	2575.00		28,000	7,21,00,000	
	First Floor	2575.00		28,000	7,21,00,000	
	Total B.U.A. =	**5150.00**	**Sq. M**		**Sub Total (A1)**	**14,42,00,000**
2	Electrification	Internal		5% of (A1)	72,10,000	
		External		6% of (A1)	86,52,000	
	Fire Fighting Arrangements etc.			@400/Sq.mt.	20,60,000	
	Lifts	2		20,00,000	40,00,000	
	Air Conditioning (for operation theatre)			L.S.	10,00,000	
	Pump house, bore well etc			L.S.	10,00,000	
	AV Room, Area Lighting, Pumps, Generator			L.S.	10,00,000	
	CCTV			L.S.	5,00,000	
					Sub Total (2)	**2,54,22,000**
3	Water Supply & Sanitary Works		5% of (A1)		**Sub Total (3)**	**72,10,000**
4	Furniture	3605.00	Sq. M	5000	**Sub Total (4)**	**1,80,25,000**
					Sub Total (A)	**19,48,57,000**
(B)	**MISCELLANEOUS ITEMS**					
	Compound Wall & Gate (Rmt.)	500.00		8,000	40,00,000	
	Water Main Storage	100000	Litres	23	23,00,000	
	Internal road, Land Development, Parking, Land Scaping, Soil Investigation etc.		4.5% of (A)		87,68,565	
	Plantation (20% of BUA x Rs 1650/-)	1030	Sq. M	1,650	16,99,500	
					Sub Total (B)	**1,67,68,065**
		Project Cost (P)= (A) + (B)				**21,16,25,065**
(C)	**PROVISIONS**					
	(i) Contingencies 4% on (sub total A1)				**57,68,000**	
	(ii) GST 18% on (P)				**3,80,92,512**	
	(iii) Price Escalation 5% on (P)				**1,05,81,253**	
	(iv) Labour Insurance 1% on (P)				**21,16,251**	
	(v) PMC Charges 1.5% on (P)				**31,74,376**	
					Sub Total (C)	**5,97,32,392**
	TOTAL PROJECT COST (TPC) (A+B+C)					**27,13,57,457**
				Say Rs. Lakhs	**2713.57**	

1	**Bldg Civil (A1)**	**`=**	**Rs**	**28,000**	**/Sqm**
2	**Bldg Civil, Elect, Water Supply, Furniture (A)**	**`=**	**Rs**	**37,836**	**/Sqm**
3	**Total (A+B)**	**`=**	**Rs**	**41,092**	**/Sqm**